# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ मध्ये करावयाच्या प्रस्तावित सुधारणांकरिता स्पष्टीकरणात्मक ज्ञापन

**पार्श्वभूमी**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ च्या (ज्यास यापुढे “ मविनिआ बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११” असे म्हणण्यात येईल ) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (येथून पुढे ‘मविनिआ’ किंवा ‘आयोग’ म्हणून संबोधण्यात येईल) ४ फेब्रुवारी २०११ रोजी अधिसूचित केले आहेत.

**खंड क्र.२,३, ४ व ५ मधील सुधारणा**

काही वीज निर्मिती कंपन्या आणि परवानाधारकांनी, मविनिआ बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ मधील विनियम ४.१ च्या परंतुकाखाली, बहु-वर्षीय वीज दराची चौकटीची अंमलबजावणीपासून सूट मिळण्यासाठी/पुढे ढकलण्यासाठी अर्ज सादर केले आहेत. हे अर्ज प्रलंबित आहेत. आयोगाने, मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ च्या विनियम, ४.१ मधील अधिकारांचा वापर करुन निर्मिती कंपन्या आणि परवानाधारकांना बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीखाली वीज दर निश्चितीकरणापासून जर सूट दिली तर, मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ खाली मविनिआ (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम २००५ रद्द करण्यात आले असल्यामुळे, निर्मिती कंपन्या आणि परवानाधारकांच्या एकूण महसुली गरज आणि वीज दरांचे निश्चितीकरण कोणत्या विनियमांखाली करावयाचे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. या संबंधी, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित ( महानिर्मिती कंपनी )ने महाराष्ट्र शासनाच्या महा अधिवक्ता यांनी व्यक्त केलेले मत आयोगास कळविले आहे. महाराष्ट्र शासनाच्या महा अधिवक्ता यांनी व्यक्त केलेले मत, इतर बाबींबरोबरच, खालीलप्रमाणे आहे:-

“९. त्यानुसार, उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांना खालीलप्रमाणे उत्तर देण्यात येत आहे-

अ) होय, ज्या पक्षकाराला बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ लागू करण्यातून सूट मिळण्याचा हक्क आहे अशा पक्षकारास विनियम ४.१ खाली सूट देण्याचा आयोगाला अधिकार आहे.

ब सूट देण्यात आल्यानंतर, सदर बहु-वर्षीय वीज दर विनियम नसतानादेखील, आयोग अधिनियमातील तरतदींनुसार वीज दर निश्चित करु शकेल. कलम ६४ अंतर्गत सोपविण्यात आलेली कायदेशीर जबाबदारी पार पाडणे आवश्यक आहे आणि विनियम नसल्याच्या कारणास्तव जबाबदारी दुर्लक्षित किंवा शिथील करता येणार नाही

क) बहु-वर्षीय वीज दर विनियम नसताना, विद्युत अधिनियम, २००३ खालील अधिकारांचा वापर करता येईल. यापूर्वीचे वीज दराचे आदेश आणि

> कलम ६१ मध्ये नमूद करण्यात आलेल्या तत्त्वांसह कलम ६४ खालील कार्यपध्दती द्वारे वीज दर निश्चित करण्यासाठी पुरेसे मार्गदर्शन मिळू शकेल.''

महाराष्ट्र शासनाच्या महा अधिवक्ता यांनी असे मत व्यक्त केले आहे की, अशा परिस्थितीत बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ नसताना विद्युत अधिनियम, २००३ खाली अधिकारांचा वापर करुन, यापूर्वीच्या वीज दराचे आदेश आणि कलम ६१ मध्ये नमूद करण्यात आलेल्या तत्वांसह कलम ६४ खाली कार्यपध्दतीला संदर्भ करुन, आयोग, एकूण महसुली गरज आणि वीज दर निश्चित करु शकेल.

विनियम नसल्याच्या कारणास्तव विद्युत अधिनियम, २००३ खाली आयोगाने वीज दर निश्चित करण्यास प्रतिबंध होत नाही हे जरी खरे असले तरी, आयोगाचे असे मत आहे की एक सावधगिरीचा उपाय म्हणून, याबाबतीतील निर्मिती कंपन्या आणि परवानाधारकांकरिता संदिग्धता आणि नियामक अनिश्चितता टाळण्यासाठी बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ मध्ये विशिष्ट तरतूद करणे उचित होईल. त्यानुसार, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ च्या विनियम ४.१ मधील परंतुकानंतर खालील जादा परंतुक दाखल करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे:-

> ''परंतु आणखी असे की, वरील परंतुकाखाली, निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाच्या वर्गवारीला बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटी अंतर्गत विशिष्ट कालावधीसाठी एकूण महसुली गरज आणि/किंवा वीज दराच्या निश्चितीकरणातून सूट देण्यात आली असेल तर, अशा सर्व प्रकरणी, खालील अटी लागू राहतील:
>
> अ) या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटी अंतर्गत व्यवसाय आराखडा सादर करावा लागेल;
>
> ब) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, (वीज दराच्या अटी आणि शर्ती) विनियम, २००५, नुसार एकूण महसुली गरज आणि वीज दराच्या मंजुरीसाठी वार्षिक याचिका, सूट देण्यात आलेल्या कालावधी दरम्यान, दाखल करण्यात येईल.''

या परंतुकाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे की, जरी मविनिआ बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ अंतर्गत बहु-वर्षीय वीज दरासाठी याचिका सादर करण्यापासून सूट देण्यात आली असली तरी, संबंधित निर्मिती कंपन्या किंवा परवानाधारकांना मविनिआ बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ अंतर्गत व्यवसाय आराखडा सादर करावा लागेल व सूट देण्यात आलेल्या कालावधी दरम्यान, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, (वीज दराच्या अटी आणि शर्ती) विनियम, २००५, अंतर्गत एकूण महसुली गरज आणि वीज दर निश्चित करण्यात येईल. यासंबंधी, विनियम ४.१ खाली सूट देण्याचा आदेश पारित करण्यात आला असेल तर संबंधित निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक यांनी, सूट देण्यात आलेल्या कालावधीच्या दरम्यान, एकूण महसुली गरज आणि वीज दराच्या वार्षिक याचिका, मविनिआ (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ नुसार, मंजुरीसाठी दाखल करण्याकरिता एक नवीन विनियम क्रमांक १०२ दाखल करण्याची आवश्यकता असल्याचे मत झाले.

त्याशिवाय, मविनिआ बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ मधील विनियम ४.१ च्या परंतुका अंतर्गत कोणत्याही पारेषण परवानाधारकाला सूट देण्यात आली असेल तर, सूट देण्यात आलेल्या कालावधी दरम्यान वार्षिक राज्यांतर्गत पारेषण दर निश्चित करणे शक्य व्हावे यासाठी योग्य विनियमाखाली परंतुक दाखल करणे आवश्यक होते. त्यानुसार, मविनिआ बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ च्या विनियम ६४.१.१ मधील परंतुकानंतर, खालील जादा परंतुक दाखल करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे:-

> “परंतु आणखी असे की, या विनियमांच्या विनियम ४.१ च्या पहिल्या परंतुकाखाली बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटी अंतर्गत विशिष्ट कालावधीसाठी पारेषण परवानाधारकास एकूण महसुली गरज निश्चित करण्यातून सूट देण्यात आली असेल तर, अशी सूट दिलेल्या कालावधीसाठी, वरील परंतुक लागू राहणार नाही.”

या परंतुकाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे की, जरी मविनिआ बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ अंतर्गत बहु-वर्षीय वीज दरासाठी याचिका सादर करण्यातून सूट देण्यात आली असली तरी, प्रत्येक वर्षी अल्प-कालीन मुक्त प्रवेश आकारांपासून मिळणारा महसूल हा नियंत्रण कालावधी सुरु होण्यापूर्वीच्या वार्षिक कालावधीत मिळत असलेल्या महसुला इतका घ्यावयाची गरज नाही; कारण सूट दिलेल्या कालावधीतील प्रत्येक वार्षिक कालावधीसाठी राज्यांतर्गत पारेषण दर निश्चित करताना मागील वर्षासाठी आकडेवारी उपलब्ध होणार आहे व मध्यावधी फेरआढावा घेण्याची कोणतीही गरज उरणार नाही.

त्याचप्रमाणे, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ च्या विनियम ६४.२.१ च्या तिसऱ्या परंतुकानंतर खालील जादा परंतुक दाखल करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे:

> “ परंतु आणखी असे की, या विनियमांच्या विनियम ४.१ च्या पहिल्या परंतुकानुसार जर पारेषण परवानाधारकाची एकूण महसुली गरज निश्चित करण्यातून बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीखाली विशिष्ट कालावधीकरिता सूट देण्यात आली असेल तर, अशी सूट दिल्याच्या कालावधीच्या दरम्यान, सर्व दीर्घ-कालीन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांकरिता बेस पारेषण क्षमता हक्कांचे निश्चितीकरण, अशी सूट देण्यापूर्वीच्या मागील १२ महिन्यात प्रचलित असलेल्या दीर्घ-कालीन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांच्या कोइन्सिडंट सर्वोच्च मागणी (सीपीडी) आणि कोइन्सिडंट नसलेल्या सर्वोच्च मागणीच्या (एनसीपीडी)च्या मासिक सरासरीच्या आधारे, करण्यात येईल.”

प्रस्तावित परंतुकात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ अंतर्गत बहु-वर्षीय वीज दर याचिका दाखल करण्यापासून सूट देण्यात आल्यास, नियंत्रण कालावधीच्या सुरुवातीला प्रत्येक वर्षासाठी मागील कलाच्या आधारे बेस पारेषण क्षमता हक्काची परिगणना करण्याची गरज नाही; कारण ज्या प्रत्येक वर्षाकरिता राज्यांतर्गत पारेषण दर निश्चित करण्यात येत आहेत त्या वर्षाकरिता बेस पारेषण क्षमता हक्काची निश्चिती मागील १२

महिन्यात प्रचलित असलेल्या दीर्घ-कालीन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांची कोईन्सिडंट सर्वोच्च मागणी (सीपीडी) आणि कोइन्सिडंट नसलेली सर्वोच्च मागणीच्या (एनसीपीडी) मासिक सरासरीच्या आधारे करण्यात येईल. त्यामुळे मध्यावधी फेरआढावा घेण्याची कोणतीही गरज उरणार नाही.

त्याशिवाय, कोणत्याही पारेषण परवानाधारकाला सूट देण्यात आली असल्यास वार्षिक वीज दराच्या निश्चितीकरणासाठी नवीन परंतुक दाखल करण्यात येत असल्यामुळे, असे वाटते की अशाच प्रकारचे परंतुक नियंत्रण कालावधी दरम्यान नवीन पारेषण परवाने मंजूर करण्याच्या शक्यतेस संबोधण्यासाठी दाखल करण्याची आवश्यकता आहे, जी आतापर्यंत कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याच्या वेळी संबोधण्यात येत होती. त्यानुसार, खालीलप्रमाणे अनुक्रमे, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ च्या विनियम ६४.३.१ च्या दुसऱ्या परंतुकात "किंवा यंत्रणेमध्ये नवीन पारेषण परवानाधारकांची भर पडल्यामुळे" हे शब्द वगळून सुधारणा करण्याचे आणि तिसरे जादा परंतुक दाखल करण्याचे, अनुक्रमे प्रस्तावित करण्यात येत आहे:

> " परंतु असे की, विनियम ६४.२ आणि ६४.३ मध्ये निश्चित केलेल्या बेस पारेषण क्षमता हक्क आणि बेस पारेषण दर यामध्ये, प्रत्यक्ष आणि मान्यता दिलेले सीपीडी आणि एनसीपीडी यातील तफावतीमुळे ~~किंवा यंत्रणेमध्ये नवीन पारेषण परवानाधारकांची भर पडल्यामुळे~~ कोणत्याही सुधारणा कामकाजाच्या मध्यावधी आढाव्याच्या वेळी आणि नियंत्रण कालावधीच्या अखेरीस करण्यात येतील."
>
> "परंतु आणखी असे की, नियंत्रण कालावधी दरम्यान जर नवीन पारेषण परवानाधारकांची राज्यांतर्गत पारेषण जाळ्यामध्ये भर घालण्यात आली तर, विनियम ६४.२ आणि ६४.३ मध्ये संदर्भ करण्यात आलेले बेस पारेषण क्षमता हक्क आणि बेस पारेषण दर हे नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरिता निश्चित करण्यात येतील."

**<u>खंड क्र. ६ मधील सुधारणा</u>**

काही निर्मिती कंपन्या आणि परवानाधारकांनी बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीखाली एकूण महसुली गरज आणि वीज दर निश्चित करण्यापासून सूट/पुढे ढकलण्यासाठी मागणी केली आहे आणि त्यांनी अद्याप व्यवसाय आराखडा आणि बहु-वर्षीय वीज दराच्या याचिका सादर केलेल्या नसल्यामुळे, अशी परिस्थिती उद्‌भवू शकेल की ज्यामध्ये आयोगाने ३१ मार्च २०११ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता पारित केलेला वीज दराचा आदेश, नवीन वीज दराचा आदेश पारित होईपर्यंत, पुढे चालू ठेवणे भाग पडेल. तथापि, व्यवसाय आराखडा आणि बहु-वर्षीय वीज दराच्या याचिका सादर करण्यात विलंब झाला असला तरी आणि बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ अंतर्गत एकूण महसुली गरज आणि वीज दर निश्चितीकरणापासून सूट/पुढे ढकलण्याचा कोणताही आदेश असला तरी देखील, बहु-वर्षीय वीज दर विनियम २०११ खाली आवश्यक असणारे दस्तऐवज दाखल करण्याचे काम पुढेही चालू राहणे आवश्यक आहे. तथापि, अशा परिस्थितीमुळे नजिकच्या दोन वर्षाच्या कालावधीत बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ खाली वीज दर निश्चितीकरणाची अंमलबजावणी करण्यात अडचण येऊ शकेल. त्यामुळे, या कालावधीदरम्यान, एकूण महसुली गरज आणि वीज दर यांची निश्चिती मविनिआ (वीज

दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ नुसार करणे भाग पडेल.

या संबंधात, आयोगाला ही बाब पूर्णपणे स्पष्ट करण्यासाठी काही तात्पुरत्या ( ट्रॅन्झिटरी ) तरतुदी करण्याची गरज वाटते. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ च्या विनियम १०१ नंतर खालील नवीन तात्पुरत्या ( ट्रॅन्झिटरी ) तरतुदी दाखल करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.:

**"१०२. तात्पुरत्या ( ट्रॅन्झिटरी ) तरतुदी :**

या विनियमांमध्ये काहीही विरुध्द नमूद करण्यात आले असले तरी -

(अ) ३१ मार्च, २०११ रोजी संपणाऱ्या वर्षासाठी आयोगाने निर्गमित केलेले वीज दर अंमलात राहतील.

आणि

(ब) व्यवसाय आराखडा आणि १ एप्रिल, २०११ पासून आर्थिक वर्ष २०१५-१६, म्हणजेच ३१ मार्च, २०१६ पर्यंत या विनियमाखाली समाविष्ट असलेल्या सर्व प्रकरणांतील एकूण महसुली गरज, वीज दरापासूनचा अंदाजित महसूल आणि वीज दराच्या निश्चितीकरणासाठीचे आकार, यांची परिगणना करण्यासाठी याचिका, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ खाली दाखल करणे व हाताळणे चालू राहील.

परंतु असे की, विनियम ४.१ खाली सूट देण्याचा आदेश निर्गमित करण्यात आला असेल तर, संबंधित निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक वार्षिक महसुली गरज आणि वीज दराच्या मान्यतेसाठी याचिका, सूट देण्यात आलेल्या कालावधीदरम्यान, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ खाली दाखल करतील.

परंतु आणखी असे की, विनियम ४.१ खाली जर निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकासाठी सूट देण्याचा आदेश नसेल तर आणि या विनियमाखाली १ एप्रिल, २०११ पासून वीज दराचे निश्चितीकरण अंमलात आणण्यात अडचण असल्याबाबत जर आयोगाचे समाधान झाले तर आणि या विनियमांखाली १ एप्रिल, २०१२ पासून किंवा कोणत्याही पुढील कालावधीपासून वीज दराची निश्चिती करणे आवश्यक झाल्यास, सदर वीज दराच्या निश्चितीकरणासंबंधी रद्द करण्यात आलेले विनियम अंमलात राहतील आणि १ एप्रिल, २०१२ पर्यंतच्या कालावधीसाठी किंवा अशा पुढील कालावधीसाठी वीज दराच्या निश्चितीकरणाकरिता या विनियमांतील तरतुदी लागू राहणार नाहीत."